# ‘ मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा ’ या पोर्टल वर कसे जावे?

**1]** गुगल वर जा व सर्च मध्ये **Saral** असे टाइप करा व सर्च करा.

**2]** सुरुवातीलाच **SARAL PORTAL** येईल त्यावर क्लीक करा.

**3]** आता तुम्हाला नऊ **Web Links** दिसतील. त्यातील **School Portal** वर क्लीक करा.

**4] User ID** च्या विंडो मध्ये तुमच्या शाळेचा युडायस क्रमांक अचूक टाईप करा.

**5] Password** च्या विंडो मध्ये **School Portal** चा पासवर्ड अचूक टाईप करा.

**6] Enter CAPTCHA** च्या विंडो मध्ये दिलेला **CAPTCHA** अचूक टाईप करा.

**7]** आता लॉग इन करा.

**8]** जर तुम्ही या वर्षी पहिल्याच वेळेस लॉग इन करत असाल तर तुम्हाला विचारले जाईल की मागील वर्षी तुम्ही जी माहिती भरली आहे ती बरोबर आहे का? अशा वेळेस तुम्हाला **Yes** यावर क्लीक करुन **Submit** करायची आहे. त्यानंतर जे **Tab edit** करायचे असतील त्यावर क्लीक करा. हे केल्यावरच तूम्ही या **Tab** वर लॉग इन व्हाल.

**9]** आता तुमच्या समोर आलेल्या इंटरफ़ेस वर वर उजव्या बाजूला ‘ मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ हा नवीन **Tab** दिलेला आहे. त्यावर क्लीक करा.

## 10] आता तुम्ही नवीन पोर्टल वर याल . हाच तो पोर्टल ज्यात आपल्याला सर्व माहिती भरायची आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान साठी माहिती भरण्याच्या बाबतीत महत्वाच्या सूचना

**1] pdf** छायाचित्र अपलोड कसे करावे **? – Choose File** या विंडो ला क्लीक करा. हा विंडो तुमच्या कॉप्युटरच्या **Downloads** या फोल्डर मध्ये ओपन होतो. त्यामुळे तुमच्या कॉप्युटरच्या **Downloads** या फोल्डर मध्ये 'माझी शाळा' नावाचे एक नवीन फोल्डर तयार करा व त्यात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियाना अंतर्गत उल्लेखित सर्व उपक्रमाचे फोटो जास्तीत जास्त **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करा व प्रत्येक **pdf** ला त्या त्या उपक्रमाचे नाव द्या. ज्यावेळेस तुम्ही **pdf** छायाचित्र अपलोड करण्यासाठी **Choose File** या विंडो ला क्लीक कराल त्यावेळेस हा विंडो तुमच्या कॉप्युटरच्या **Downloads** या फोल्डर मध्ये ओपन होईल तेथे तुम्ही अगोदरच तयार केलेला 'माझी शाळा' नावाचा फोल्डर दिसेल तो ओपन करा. त्यात तुमच्या उपक्रमाच्या नावाची **pdf** शोधा. सिलेक्ट करण्यासाठी त्यावर लेफ्ट क्लीक करा व **OPEN** या विंडो ला क्लीक करा. तुमचे **pdf** छायाचित्र अपलोड होईल

**2] pdf** छायाचित्राचे थोडक्यात वर्णन कसे लिहावे **? –** मी प्रत्येक उपक्रमाचे वर्णन **editable text** असलेली **word file** मी माझ्या गुगल ड्राइव्ह वर दिलेली आहे. गुगल ड्राइव्ह ची लिंक पुढीलप्रमाणे आहे. त्यावर क्लीक करा व **word file** डाऊनलोड करा त्यातील उपक्रमाच्या अनुषंगाने असलेले थोडक्यात वर्णन कॉपी करा व **'1000** अक्षर फक्त' असे लिहिलेल्या विंडोमध्ये पेस्ट करा. जर तुम्हाला तुमचे स्वतःचे वर्णन लिहायचे असेल तर चांगली बाब आहे पण वर्णन लिहिताना फक्त पूर्णविराम व स्वल्पविराम याशिवाय कोणतेही चिन्ह वापरायचे नाही. डायरेक्ट विंडो मध्ये न लिहिता वर्ड फाईल मध्ये वर्णन लिहून घ्या व त्या मजकुराला कॉपी करुन **'1000** अक्षर फक्त' या विंडो मध्ये पेस्ट करा.

**3]** प्रत्येक वेळेला **SAVE** करा **- pdf** छायाचित्र अपलोड केल्यावर व **pdf** छायाचित्राचे थोडक्यात वर्णन लिहिल्यावर प्रत्येक वेळेस **SAVE** या बटणावर क्लीक करा. म्हणजे समजा तुम्ही आज **2** उपक्रमांची माहिती अपलोड केली तर ती अपलोड झाल्यावर तुंही **SAVE** बटणावर क्लीक करा त्यामुळे तुम्ही अपलोड केलेली माहीती **SCHOOL PORTAL** वर त्याच वेळेस सेव्ह होईल. जर **SAVE** न करता तूम्ही लॉग ऑफ केले तर तुम्ही अपलोड केलेली माहिती उडून जाईल

व तुम्ही ज्या वेळेस पुन्हा **SCHOOL PORTAL** ओपन कराल तेव्हा ती माहिती तुम्हाला पुन्हा अपलोड करावी लागेल.

**4]** जोपर्यंत सर्व माहिती पूर्णपणे भरली जात नाही तोपर्यंत **Finalize** करु नका – जोपर्यंत तुमची सर्व माहिती भरली जात नाही तोपर्यंत कोणत्याही परिस्थितीत **Finalize** बटणाला क्लीक करु नका कारण एकदा का तुम्ही **Finalize** बटणाला क्लीक केले की तुम्ही कोणातिही माहिती भरू शकणार नाही

## भाग 'अ'

### अ) विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे आयोजन व त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग - 60 गुण

**1] शाळा व परिसराचे सौंदर्यीकरण 10 गुण**

**2] विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमातील व्यवस्थापनातील व निर्णय प्रक्रियेतील सहभाग 15 गुण**

**3] शैक्षणिक गुणवत्ता विकास व व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रम 10 गुण**

**4] शाळेची इमारत व परिसर स्वच्छता 10 गुण**

**5] राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देण्याबाबतचे उपक्रम 05 गुण**

**6] विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन 10 गुण**

## भाग 'ब'

## ब) शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम व त्यातील विविध घटकांचा सहभाग - 40 गुण

1] आरोग्य

15 गुण

2] आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास

10 गुण

3] भौतिक सुविधांबाबत खाजगी संस्था, व्यक्ती, कंपनी, यांचा सहभाग व शाळा व्यवस्थापन समिती 05 गुण

4] तंबाखूमुक्त , प्लॅस्टीकमुक्त पर्यावरण शिल्लक अन्न प्रक्रिया विल्हेवाट 05 गुण

5] शाळेचे माजी विद्यार्थी, पालक, स्थानिक सेवाभावी संस्थांचा शाळा उपक्रम सहभाग 05 गुण

---

एकूण गुण 100 गुण

## भाग 'अ'

## अ) विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे आयोजन व त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग - 60 गुण

### 1] शाळा व परिसराचे सौंदर्यीकरण -

i) विद्यार्थ्यांमार्फत वर्ग सजावट व शाळा सजावट :- 2 गुण

📸 pdf छायाचित्र –

विद्यार्थ्यांमार्फत वर्ग सजावट करतानाचे फोटो काढावेत 2MB च्या pdf मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावेत

### 🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

विद्यार्थ्यांमार्फत वर्ग सजावट व शाळा सजावट या उपक्रमा अंतर्गत आमच्या शाळेत विद्यार्थी आणि शिक्षक यांनी परिसरातील उपलब्ध वस्तू पासून विविध शैक्षणिक साहित्य तयार केले. त्या मधुन निवडक शैक्षणिक साहित्य लावून विद्यार्थी व शिक्षक यांनी वर्ग सजावट केली. शिवाय शाळा सजावट देखील केली आहे. तरी वर्ग सजावट व शाळा सजावट केलेले फोटो आपल्या माहिती करीता सादर करीत आहे

## ii) शाऴेच्या आवारात पर्यावरण संरक्षणास हातभार लावणाऱ्या वृक्षांचे रोपण व जोपासना – 3 गुण

### 📸 pdf छायाचित्र –

विद्यार्थ्यांमार्फत वृक्षारोपण करतानाचे फोटो काढावेत **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत

### 🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेच्या आवारात पर्यावरण संरक्षणास हातभर लावण्यासाठी शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले आहे. या मध्ये विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. शिक्षक व विद्यार्थी व इतर कर्मचारी वर्ग या वृक्षाची देखभाल करण्यासाठी सतत प्रयत्न करतात. पर्यावरण जनजागृती साठी शाळेत वृक्षारोपण उपक्रम आयोजित करण्यात येतो. मान्यवर माजी विद्यार्थी, पालक यांना आमंत्रित करण्यातआले होते. शाळेत करण्यात आलेली वृक्षारोपण फोटो आपल्या माहिती करीता सादर करीत आहे

## iii) शाऴेच्या इमारतीची व असल्यास संरक्षक भिंतीची रंगरंगोटी – 2 गुण

### 📸 pdf छायाचित्र –

इमारतीचे रंगरंगोटी करतानाचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत

### 🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेच्या इमारतीला आम्ही पावसाळा संपल्यावर दिवाळीच्या सुमारास नुकताच

आमच्या शाळेच्या इमारतीला आम्ही पावसाळा संपल्यावर दिवाळीच्या सुमारास नुकताच रंग लावला आहे. इमारतीला आतून बाहेरून व इमारतीच्या संरक्षक भिंतीना रंग रंगोटी केली आहे. तरी याबाबतचे फोटो आपल्या माहिती करिता सादर करत आहे.

### iv) प्रबोधनात्मक सुविचार, चित्रे इत्यादीद्वारे बोलक्या भिंतीची उभारणी – 3 गुण

📸 pdf छायाचित्र –

शाळेच्या बोलक्या भिंती, भिंतीवर अभ्यासातील फोटो, पाढे, चौदाखडी, मानवी शरीराचे अवयव दाखवणारे , प्राणी पक्षी, सुविचार अशा प्रकारचे फोटो काढावेत. यासाठी उल्लेखित सर्व बाबींची चित्रे शालेय भिंतींवर काढावित किंवा फ्लेक्स बोर्ड तयार करुन भिंतींवर लावावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेच्या भिंती रिकामी नसून बोलक्या भिंती आहेत. प्रत्येक भिंतीवर विविध इयत्तेच्या विविध विषयातील प्रसंग रेखाटले आहेत., भिंतीवर अभ्यासातील फोटो, पाढे, चौदाखडी, मानवी शरीराचे अवयव दाखवणारे , प्राणी पक्षी, सुविचार अशा स्वरुपात भिंती बोलक्या केल्या आहेत. तरी याबाबतचे फोटो आपल्या माहिती करिता सादर करत आहे.

## 2] विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमातील व्यवस्थापनातील व निर्णय प्रक्रियेतील सहभाग 15 गुण

### i) विद्यार्थी मंत्रिमंडळ /बालसंसद स्थापन करुन त्याद्वारे शाळेतील कामकाज पार पाडणे – 2 गुण

📸 pdf छायाचित्र –

आपल्या शाळेतील एक किंवा दोन वर्ग मंत्रीमंडळाच्या तक्त्याचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत विद्यार्थी मंत्री मंडळ स्थापन करण्यात आली या मध्ये मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री शिक्षणमंत्री स्वच्छता मंत्री असे विविध खाते बाबत विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाची माहिती दिली शाळेच्या दैनंदिन कामे सरळीत पार पडण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आली शाळेच्या मुख्याध्यापकांनी मंत्री मंडळची कामकाज निरिक्षण व मार्गदर्शन करतात आपल्या माहिती करीता शाळेच्या मंत्रिमंडळ फोटो सदर करीत आहे

## ii) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या अनुषंगाने नियोजन व अंमलबजावणी यामधील विद्यार्थ्यांचा सहभाग – 2 गुण

📸 pdf छायाचित्र –

विद्यार्थी मध्यान्ह भोजन करीत असताना वर्गात शिस्तीत ओळीत बसवून त्यांचे फोटो काढावेत. सर्व विद्यार्थी शालेय गणवेशात असावेत. तसेच पोषण शक्ती आहार सोमवार ते शनिवार च्या पाककृती च्या चार्ट चा फोटो काढावा. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रमांतर्गत मध्ये सोमवार ते शनिवार पर्यंत शासन मार्गदर्शित मेनू प्रमाणे विद्यार्थ्यांना महिला मंडळ द्वारे पोषण आहार पुरवला जातो. दररोजच्या पोषण आहाराची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टर असे 'चव रजिस्टर' ठेवले आहे. त्यावर दररोजच्या मेनूची नोंद केली जाते. प्रत्येक वर्गाचे वर्गशिक्षक अगोदर स्वतः चव घेतात व त्याची दररोजची नोंद'चव रजिस्टर' मध्ये ठेवली जाते. पोषण शक्ती आहाराचे शिक्षक स्वतः वाटप करतात. सदर उपक्रमाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

## iii) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या अनुषंगाने शाळेच्या आवारात परसबागेची निर्मिती करुन त्याद्वारे आरोग्यदायी भाज्यांची लागवड यामधील विद्यार्थ्यांचा सहभाग – 3 गुण

📸 pdf छायाचित्र –

जर तुमच्या शाळेत परसबाग असेल तर, परसबागेत ज्या विविध आरोग्यदायी भाजांची

लागवड केली आहे त्यांचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

परसबाग असेल तर –

आम्ही आमच्या शाळेत असलेल्या जागेत एक छोटी परसबाग तयार केली आहे. त्यात चवळी, मेथी, भोपळा, घेवडा कोथिंबीर आदी आरोग्यदायी भाजांची लागवड केली आहे. या भाज्या आम्ही दररोज प्रधानमंत्री पोषण शक्ती आहाराच्या पाककृतीत वापरतो. कार्यानुभवाच्या तासाला विद्यार्थी व शिक्षक या परसबागेची देखभाल करतात. सदर उपक्रमाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

परसबाग नसेल तर –

आमच्या शाळेतच्या आवारात जागा नसल्याने तसेच परसबागेसाठी संरक्षक कंपाउंड नसल्याने परसबागेची निर्मिती केली गेली नाही. त्यामुळे उपक्रमाचे फोटो उपलब्ध नाहीत.

## iv) मेरी माटी मेरा देश या उपक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग – 3 गुण

📸 pdf छायाचित्र –

‘ मेरी माटी मेरा देश ’ या उपक्रमांतर्गत माती हातात घेवून शपथ घेतानाचे, कलशात माती जमा करतानाचे, दिवा हातात घेवून शपथ घेतानाचे, वृक्षारोपण करतानाचे, रॅली काढतानाचे असे विविध फोटो एकत्र करावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या  शाळेत मेरी माटी मेरा देश हा उपक्रम राबविण्यात आले या उपक्रमात शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थी व शिक्षकांनी माती हातात घेऊन लिंकभरले विद्यार्थ्यांना मातीचा महत्त्व बाबत मार्गदर्शन केले हा उपक्रम राबवताना विद्यार्थी पालक शिक्षक उस्ताहान सहभाग घेतले सदर उपक्रमाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

## v) शाळेची बचत बँक/पैशाचा योग्य विनियोग व व्यवस्थापन यातील विद्यार्थ्यांचा सहभाग – 2 गुण

📸 pdf छायाचित्र –

तुम्ही विद्यार्थ्यांचे पोस्ट ऑफिस मध्ये शुन्य बॅलन्स वर अकाउंट काढले असतील किंवा इतर कोणत्याही बंकेत अकाउंट काढले असतील. विद्यार्थ्यांना उभे करुन बँकेचे पासबुक हातात समोर घेवून फोटो काढावेत. विविध फोटो एकत्र करावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या विद्यार्थ्यांना शासनाद्वारे मिळणारे विविध भत्ते उदा. उपस्थिती भत्ता, स्कॉलरशिप वगैरे विद्यार्थ्यांच्या खात्यात  डायरेक्ट जमा होणेसाठी तसेच विद्यार्थ्यांना लहान लहान बचतीची सवय लागण्यासाठी पोस्टात तसेच इतर बँकेत विद्यार्थ्यांचे अकाउंट काढाण्यात आले. चेकबुक पासबुक डी डी एटी एम जमा खर्च या विषयावर चर्चा करण्यात आले. सदर उपक्रमातील विद्यार्थी सहभाग  फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

## vi) नवभारत साक्षरता अभियानातील शाळेचा सहभाग – 2 गुण

📸 pdf छायाचित्र –

नवभारत साक्षरता अभियानांतर्गत शालेय परिसरातील असाक्षरांना ( निरक्षरांना) शिकवतानाचे नवभारत साक्षरता अभियानाचे फोटो काढावेत. विविध फोटो एकत्र करावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

## 🖊 **pdf** छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत नवभारत साक्षरता अभियान हा उपक्रम राबविण्यात आला आहे. यामध्ये शिक्षक परीसरात गृहभेट देउन असाक्षर म्हणजेच निरक्षरांचा शोध घेतला. या निरक्षरांची माहिती विहित नमुन्यात भरुन मुख्याध्यापकांना सादर केली. मुख्याध्यापकांनी सदर माहिती **CRC** प्रमुख कडे जमा केली. नंतर नवभारत साक्षरता अभियान प्रशिक्षणाला आमच्या शाळेतील काही शिक्षक गेले व नंतर त्या प्रशिक्षणाची माहीती त्यांनी मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांना दिली. प्रशिक्षणात केलेल्या मार्गदर्शनानुसार आम्ही शिक्षक शाळेत दर शनिवारी नवभारत साक्षरता वर्ग घेतो. आशा प्रकारे आमच्या शाळेत नवभारत साक्षरता उपक्रम राबविण्यात आला आहे. नवभारत साक्षरता वर्गाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

# 3] शैक्षणिक गुणवत्ता विकास व व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रम 10 गुण

### i) विद्यार्थी शाऴेतील उपस्थितीचे प्रमाण – 2 गुण

## 📸 **pdf** छायाचित्र –

**100%** उपस्थिती असताना सर्व वर्गाचे फोटो व त्या दिवसाच्या डे-बुक(दैनिक हजेरी) चा फोटो काढावा. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

## 🖊 **pdf** छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेतील विद्यार्थीचे उपस्थिती प्रमाण चांगले आहे उपस्थिती वाढविण्यासाठी शनिवार गोष्टी गायन आदी उपक्रम राबविण्यात येतात. विद्यार्थी या उपक्रमात उत्साहाने सहभागी होतात. शिवाय विद्यार्थी अनुपस्थित राहिला तर दुसर्या दिवशी शिक्षक स्वतः विद्यार्थ्याच्या घरी गृहभेट देतात. त्यामुळे विद्यार्थी अनुपस्थितीत राहत नाहित. शाळेच्या विद्यार्थी दैनिक हजेरी, डे-बुक चा देखील आपल्या माहिती करिता सादर केला आहे.

### ii) महावाचन चऴवऴीतील विद्यार्थ्यांचा सहभाग – 2 गुण

## 📸 pdf छायाचित्र –

' वाचन प्रेरणा दिन ' चे फोटो, जर शाळेत आठवड्याला वाचन तासिका ठेवली असेल तर त्या तासिकेत विद्यार्थी वाचन करत असतानाचे फोटो. शिवाय जर शाळेत ग्रंथालय असेल तर ग्रंथालयात विद्यार्थी वाचन करत असतानाचे फोटो. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

## 🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. विद्यार्थ्यांचे वाचन सुधारावे म्हणून दर शनिवारी आम्ही वाचन दिन आयोजित करतो. या दिवशी मराठी, हिंदी व इंग्रजी विषयाचे वाचन विद्यार्थ्यांकडून करुन घेतले जाते. वाचनात कमजोर विद्यार्थ्यांचे वाचन सुधारावे म्हणुन त्याना उपचारात्मक मार्गदर्शन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून विद्यार्थ्यांना ग्रंथालय वाचन करण्यासाठी दिले जाते व त्यांनी वाचलेल्या पुस्तकांची नोंद ठेवली जाते. या उपक्रमात शाळेतील सर्व इयत्ता मधील विद्यार्थी सहभागी होतात शाळेत वाचन दिनाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

### iii) वक्तृत्व स्पर्धा / लेखन स्पर्धा / संगित स्पर्धा व इतर स्पर्धा यांचे आयोजन व त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग – 3 गुण

## 📸 pdf छायाचित्र –

महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी, राष्ट्रीय सण, वार्षिक स्नेहसम्मेलन आदी प्रसंगी आयोजित केलेल्या वक्तृत्व /वाचन/गायन / चित्रकला स्पर्धांचे फोटो. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

## 🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी, राष्ट्रीय सण, वार्षिक स्नेहसम्मेलन आदी प्रसंगी वक्तृत्व /वाचन/गायन /चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी, मेडल तसेच इतर शालोपयोगी वस्तू बक्षीस म्हणुन दिल्या जातात. शिवाय बाहेर होणाऱ्या विविध स्पर्धेत शाळेमार्फत विद्यार्थी सहभागी होतात व बक्षिस मिळवतात. सदर फोटो आपल्या माहिती करीता सादर केले आहेत.

### iv) यथाशक्ती NCC / Scout Guide /MCC व समान प्रकारच्या इतर उपक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग –

### 3 गुण

## 📸 pdf छायाचित्र –

**NCC / Scout Guide /MCC मध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याबाबतचे फोटो. हे फोटो 2MB च्या pdf मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावेत.**

🖋️ **pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –**

**शाळेत NCC / Scout Guide /MCC असेल तर –**

आपल्या शाळेत स्काऊट गाईड उपक्रम राबविण्यात येत आहे या मध्ये सर्व विद्यार्थी सहभागी होतात दिलेले उपक्रम पूर्ण करतात स्वतंत्र दिन वेळी सहभागी होतात असे प्रकारे आपल्या शाळेत स्काऊट गाईड उपक्रम राबविण्यात येत आहे सदर उपक्रमाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

**शाळेत NCC / Scout Guide /MCC नसेल तर –**

आमच्या शाळेत1ली ते 4थी पर्यंतचे वर्ग आहेत त्यामुळे **NCC / Scout Guide /MCC** हे उपक्रम आमच्या शाळेत लागु नाहीत.

आमच्या शाळेत **NCC / Scout Guide /MCC** हे उपक्रम राबवण्यात येत नाहित. शाळेत लवकरच **Scout Guide** चे पथक स्थापन करण्यात येणार आहे.

## 4] शाळेची इमारत व परिसर स्वच्छता

**10 गुण**

### i) स्वच्छता मॉनिटर अभियान टप्पा-2 मधील सहभाग – 10 गुण

📸 **pdf छायाचित्र –**

परिसर स्वच्छता करत असतानाचे विद्यार्थ्यांचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावेत.

🖋️ **pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन -**

शाळेने स्वच्छता मॉनिटर अभियान अंतर्गत विद्यार्थी सहभाग नोंदवला आहे. ऑनलाईन नोंदणी सुद्धा झाली आहे. शाळेमध्ये ‘एक दिवस स्वच्छतेचा’ हा उपक्रम घेवून शाळा व परिसराची स्वच्छता करण्यात येते. सदर फोटो आपल्या माहिती करीता सादर केले आहेत.

## 5] राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देण्याबाबतचे उपक्रम

**05 गुण**

### i) प्रत्येक शाळेने देशातील कोणतेही एक राज्य निवडून त्याचा सांस्कृतिक वारसा जसे पेहराव , खानपान सण-उत्सव इत्यादी बाबत तसेच राष्ट्राच्या उभारणीत त्या राज्याचे योगदान याची महती दर्शविणारे सादरीकरण – 05 गुण

📸 **pdf छायाचित्र –**

या उपक्रमासाठी जे राज्य निवडले आहे त्याचा पेहराव करून नाटकाचे सादरीकरण करत असलेल्या नाटकांचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावेत.

🖋️ **pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन -**

सदर उपक्रमासाठी आपला राष्ट्रीय सण म्हणजे **26** जानेवारी भारताचा प्रजासत्ताक दिन या दिवशी या उपक्रमाची माहिती देण्यात आली. कोणत्याही एका राज्याचा सांस्कृतिक वारसा, पेहराव, खानपान सण-उत्सव याची माहिती देण्यासाठी महाराष्ट्र हे राज्य आमच्या शाळेने निवडले व वरील घटकाची माहिती दर्शवणारे छोटे नाटक सादर करण्यात आले. शिवाय राष्ट्राच्या उभारणीत महाराष्ट्र राज्याचे योगदान व महती याचे सादरीकरण केले. सदर फोटो आपल्या माहिती करीता सादर केले आहेत.

## 6] विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन

**10 गुण**

### i) विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन – यात अधिकाधिक देशी खेळांना प्राधान्य - 10 गुण

📸 **pdf छायाचित्र –**

कब्बड्डी, खो-खो, धावणे, बुद्धीबळ, संगीत खुर्ची, लिंबु चमचा वगैरे क्रीडा स्पर्धांचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावेत.

🖋️ **pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –**

आमच्या शाळेत दरवर्षी वार्षिक क्रीडा सप्ताह आयोजित केला जातो. यात अमच्या शाळेत विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन केले जाते. उदा. कब्बड्डी, खो-खो, धावणे, बुद्धीबळ, संगीत खुर्ची, लिंबु चमचा शर्यत. या स्पर्धा 1ली ते 7वी अशा सर्व वर्गाच्या घेतल्या जातात. क्रीडास्पर्धेत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देवून त्यांचा सत्कार केला जातो. सदर फोटो आपल्या माहिती करीता सादर केले आहेत.

## भाग 'ब'

### ब) शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम व त्यातील विविध घटकांचा सहभाग - 40 गुण

## 1] आरोग्य

## 15 गुण

### i) विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या करिता आरोग्य तपासणी शिबिर यात आरोग्याची सर्वसाधारण तपासणी - 5 गुण

📸 **pdf** छायाचित्र –

विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करत असतानाचे विविध फोटो काढावेत. मागे फलकावर ‘ विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आरोग्य शिबिर’ असा बॅनर लिहिलेला असणे आवश्यक आहे. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावेत.

🖋 **pdf** छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची आरोग्य तपासणी मनपा वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत करण्यात आली. शाळेतील सर्व इयत्ता मधील विद्यार्थ्यांना वैद्यकीय तपासणी करून मार्गदर्शन करण्यात आले विद्यार्थी आजारी बाबत पालकना सुचेना दिली वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली अहवाल यांची अहवाल फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

### ii) शाऴेत प्राथमोपचार पेटीची उपलब्धता – 2 गुण

📸 **pdf** छायाचित्र –

शाळेत असलेल्या प्राथमोपचार पेटीचा फोटो काढावा. पेटीवर प्राथमोपचार पेटी / **First Aid Box** असे लिहिलेले असणे आवश्यक आहे. हा फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावा.

🖋 **pdf** छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या आरोग्य योजनेची लाभ होण्यासाठी शाळेत प्रथमोपचार पेटी उपलब्ध आहे. आवश्यकता पडल्यास त्याचा उपयोग केला जातो. त्या मध्ये अवश्यक साहित्य उपलब्ध आहे प्रथमोपचार पेटी उपलब्ध बाबत फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

### iii) बदलत्या जीवन शैलीमुळे लहान वयातच होवू लागलेल्या लठ्ठपणा मधूमेह व डोळ्यांचे विकार यासारख्या आजारांची माहिती व त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन पर व्याख्यान – 3 गुण

📸 pdf छायाचित्र –

व्याख्यान देत असतानाचा फोटो काढावेत . मागे फलकावर ‘ बदलत्या जीवन शैलीमुळे लहान वयात होणारा लठ्ठपणा, मधूमेह, डोळ्यांचे विकार या आजारांची माहिती व प्रतिबंधात्मक उपाय’ असा बॅनर लिहिलेला असणे आवश्यक आहे. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत बदलत्या जीवनशैलीमुळे लहान वयात होऊ लागलेल्या लठ्ठपणा मधुमेह डोळ्याचे आजार यावर तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या आजाराची कारणे व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याची माहिती सांगण्यात आली. याबाबतची व्हिडिओ दाखविले चर्चा करण्यात आली. डोळ्याचे महत्त्व या वर निबंध स्पर्धा घेण्यात आली या मध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

### iv) किशोरवयीन विद्यार्थीनींसाठी मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत समुपदेशन सत्राचे आयोजन – 3 गुण

📸 pdf छायाचित्र –

किशोरवयीन विद्यार्थीनींसाठी मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत समुपदेशन सत्राचे फोटो काढावेत. मागे फलकावर ‘किशोरवयीन विद्यार्थीनींसाठी मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत समुपदेशन’ असा बॅनर लिहिलेला असणे आवश्यक आहे. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत किशोर वयातील विद्यार्थी साठी मासिक पाळी व्यवस्थान या बाबत समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले या मध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले महिला शिक्षिका या बाबत मार्गदर्शन केले विद्यार्थी सोबत मुक्त चर्चा करण्यात आली या परिस्थितीत काय करावे काय करू नये या बाबत मार्गदर्शन करण्यात आले या उपक्रमात सहभागी होऊन चर्चा केली या बाबत फोटो आपल्या माहिती करीता सदर करण्यात येत आहे

### v) हात स्वच्छ धूण्याचे योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक व त्यासाठीची सुविधा – 2 गुण

📸 pdf छायाचित्र –

विद्यार्थ्यांना हात स्वच्छ कसे धुवावेत याचे प्रात्यक्षिक दाखवतानाचे तसेच विद्यार्थी हात स्वच्छ धूतानाचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करून अपलोड करावेत.

## 🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छ हाथ घुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले व सर्व विद्यार्थी कडून करुन घेण्यात आले. हाथ स्वच्छ घुण्याचे फायदे या बाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून नाटिका बसवुन हात स्वच्छ धुण्याचे महत्व पटवून सांगण्यात आले. या मध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले या उपक्रम बाबत फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

## 2] आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास

**10 गुण**

**i) विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासूनच आर्थिक साक्षरता रूजविण्याच्या दृष्टीने पैशाचे नियोजन, गुंतवणूक, बँकाचे व्यवहार, कर्ज व व्याज प्रणाली इत्यादी बाबत तसेच आर्थिक व्यवहाराकरिता UPI सारख्या आधुनिक साधनांचा वापर करताना घ्यावयाची काळजी याबाबत तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनपर व्याख्यान –**

**5 गुण**

## 📸 pdf छायाचित्र –

बँक मॅनेजर व्याख्यान देतानाचे फोटो काढावेत. मागिल फलकवर ‘ आर्थिक मार्गदर्शन’ असे नक्की लिहावे. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

## 🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत विद्यार्थ्यां मध्ये शालेय जीवनापासूनच आर्थिक साक्षरता रूजविण्यसाठी पैशाची गुंतवणूक बँकेच्या व्यवहार कर्ज आर्थिक व्यवहार यु पी आय या बाबत मार्गदर्शन करण्यात आले. एका बँकेच्या मॅनेजर साहेबांना यासाठी मार्गदर्शन व्याख्यानाला बोलवण्यात आले होते. या उपक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते या उपक्रमात बँकेच्या व्यवहाराबाबत माहिती दिली. कर्ज, व्याज प्रणाली, पासबुक चेकबुक एक टी एम तसेच यु पी आय बाबत मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिक करून दाखविले व विद्यार्थी कडून करुन घेण्यात आले प्रत्येक विद्यार्थी सहभागी झाले अशी प्रकारे आपल्या शाळेत उपक्रम राबविण्यात आले. या बाबत फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

**ii) स्वयंरोजगार व्यवसाय, व्यापार, उद्योग अशा क्षेत्रात भविष्यात करीअर घडविण्यासाठी विशिष्ट कौशल्यावर आधारित व्यवसाय शिक्षणाचे महत्व**

**विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन पर व्याख्यान- यात अशा अभ्यासक्रमांची ओळख, शिक्षण देणाऱ्या संबंधित संस्था, प्रवेश प्रक्रिया, भविष्यातील संधी इत्यादीबाबतची माहिती असावी – 5 गुण**

📸 pdf छायाचित्र –

करिअर मार्गदर्शन सत्राचा फोटो काढावेत. मार्गदर्शन सत्राच्या मागील फलकावर 'व्यवसाय मार्गदर्शन किंवा करिअर मार्गदर्शन' असा बॅनर असणे गरजेचे आहे. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी स्वयं रोजगार, व्यवसाय, व्यापार, उद्योग ,अशा क्षेत्रात भविष्यात करीयर घडविण्यासाठी विशिष्ट कौशल्यावर आधारित शिक्षणाचे महत्त्व या वर मार्गदर्शन करण्यात आले विद्यार्थ्यांना व्हिडिओ दाखविले व या वर चर्चा करण्यात आली आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

**3] भौतिक सुविधांबाबत खाजगी संस्था, व्यक्ती, कंपनी, यांचा सहभाग व शाळा व्यवस्थापन समिती 05 गुण**

**i) भौतिक सुविधा तसेच अध्यापन व अध्ययनाशी संबंधित आधुनिक साधनांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्या, स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती इत्यादी घटकांकडून वस्तू व सेवा यांच्या स्वरुपात अधिकाधिक देणगी गोळा करण्यासाठीचे प्रयत्न – 03 गुण**

📸 pdf छायाचित्र –

कार्पोरेट कंपन्या, स्वयंसेवी संस्था, **NGO**, दानशूर व्यक्ती यांच्याकडून शाळेला विविध वस्तू भेट देतानाचे फोटो काढावेत. मागील फलकावर वस्तू भेट देणाऱ्या संस्थेचे नाव असावे. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

शाळेमध्ये विविध भौतिक सुविधा तसेच अध्यापन साहित्य उपलब्ध करणेसाठी विविध कार्पोरेट कंपनी, **NGO** , स्वयंसेवी संस्था यांना संपर्क करून आमच्या शाळेला बेंच, पंखे, शालोपयोगी साहित्य आदी प्राप्त करुन घेतले. अशा प्रकारे आधूनिक साधने व भौतिक सुविधा समाजाच्या मदतीने प्राप्त करुन घेतल्या. या बाबत फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

**ii) शाळा व्यवस्थापन समितीने पार पाडलेले अन्य कोणतेही प्रभावी कामकाज – 02 गुण**

📸 pdf छायाचित्र –

शाळा व्यवस्थापन समितीच्या कामकाजीय बैठकीचा फोटो किंवा शालेय व्यवस्थापन समितीच्या नोंदणी रजिस्टर चा फोटो काढावा. हा फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावा..

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमच्या शाळेत प्रत्येक महिन्याला शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेण्यात येते. या सभेमध्ये शाळेतील विद्यार्थी विषय व प्रशासन विषयावर चर्चा करण्यात येते. या सर्व बाबींची नियमित नोंद ठेवण्यात आली आहे. आपल्या माहिती करीता शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकिचा फोटो सादर करण्यात येत आहे.

## 4] तंबाखूमुक्त , प्ल◌ॅस्टीकमुक्त पर्यावरण शिल्लक अन्न प्रक्रिया विल्हेवाट 05 गुण

**i) तंबाखू मुक्त शाळा :- शाळेपासून किमान 200 मीटर अंतरावर तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीस बंदी – 01 गुण**

📸 pdf छायाचित्र –

तंबाखूमुक्त शाळा या आशयाचा फ्लेक्स बॅनर/ भिंतीवरील बॅनर शाळेत मुख्य ठिकाणी, शाळेच्या मुख्य गेटवर लावावा व त्याचा फोटो काढावा. हा फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावा..

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमची शाळा तंबाखू मुक्त शाळा असे घोषित करण्यात आले आहे तसेच शाळेपासून किमान 200 मीटर अंतरावर तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बंदी आहे या बाबत फलक लेखन शाळेचे गेट समोर भिंतीवर लेखन करण्यात आले आहे आपल्या शाळेत स्वच्छता अभियान अंतर्गत तंबाखू गुटखा सेवनामुळे होणारे परिणाम बाबत चर्चा करण्यात येत आहे सदर उपक्रमाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

**ii) प्लास्टिक मुक्त शाळा :- पर्यावरणास हानिकारक असलेल्या प्लास्टिकचा वापर शाळेच्या आवारात अथवा कामकाजात होणार नाही याची दक्षता – 02 गुण**

📸 pdf छायाचित्र –

प्लॅस्टीक मुक्त प्रभातफेरी चा फोटो किंवा शालेय परिसरात प्लॅस्टीकचा वापर करु नये अशा आशयाचा फ्लेक्स बोर्ड किंवा भिंतीवरील बोर्ड याचा फोटो काढावा. हा फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावा.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आमची शाळा प्यास्टीक मुक्त शाळा असे घोषित करण्यात आले आहे. आमच्या शाळेत परिसरात प्यास्टीक वापर करु नये या बाबत मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे. 'स्वच्छता अभियान' अंतर्गत प्रभातफेरी च्या वेळी प्यास्टीक मुक्तपर्यावरण या वर घोषणा देण्यात आल्या आहेत. या उपक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक सहभागी होते. या बाबत फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

**iii) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येत असलेल्या पोषण आहारातील शिल्लक अन्नावर योग्य ती प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यासाठी अभिनव उपक्रम – 2 गुण**

📸 pdf छायाचित्र –

शिल्लक अन्न टाकीत एकत्र करुन गोठ्यात / गोशाळेत नेतानाचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत..

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

आपल्या शाळेत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शिल्लक अन्नावर योग्य प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जाते. सदर एका टाकीत एकत्र करुन ते जवळच्या गोठ्यात व गोशाळेत गुरांना खाण्यासाठी पाठवण्यात येते. या उपक्रमाचे फोटो आपल्या माहिती करीता सादर करण्यात येत आहे

**5] शाळेचे माजी विद्यार्थी, पालक, स्थानिक सेवाभावी संस्थांचा शाळा उपक्रम सहभाग 05 गुण**

**i) उपरोल्लेखित विद्यार्थीकेंद्रित उपक्रम तसेच शाळा व्यवस्थापनांनी आयोजित करावयाचे उपक्रम यामध्ये शाळेचे माजी विद्यार्थी, पालक, स्थानिक सेवाभावी संस्था इत्यादींचा शक्य असेल त्याठिकाणी अधिकाधिक सहभाग – 05 गुण**

📸 pdf छायाचित्र –

**15** ऑगस्ट **26** जानेवारी तसेच शाळेचे वार्षिक स्नेहसम्मेलन यांचे फोटो काढावेत. हे फोटो **2MB** च्या **pdf** मध्ये कन्व्हर्ट करुन अपलोड करावेत.

🖋 pdf छायाचित्राचे थोडक्यात वर्णन –

राष्ट्रीय सण म्हणजेच **15** ऑगस्ट **26** जानेवारी तसेच शाळेचे वार्षिक स्नेहसम्मेलन या दिवशी सदर उपक्रम शालेत आयोजित करण्यात येतात. या दिवशी शाळेचे माजी विद्यार्थी-विद्यार्थीनी, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शाळेच्या संस्थेचे सदस्य तसेच सेवाभावी संस्था यांचे सदस्य यांना निमंत्रीत केले जाते. ते सर्व आनंदाने कार्यक्रमात सहभागी होतात. या उपक्रमाचे फोटो आपल्या माहितीकरिता सादर करण्यात येत आहेत.